**गोपनीय**

क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/११७

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
<u>मुंबई - ४०० ०५१</u>.

दिनांक : १३ ऑक्टोबर, २००६.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २००६ (गुरुवार) रोजी झालेल्या ११७ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

१३.१०.२००६

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

प्रति,

सर्व सदस्य व निमंत्रित

**प्रत अग्रेषित :-**

विधि सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ११७ व्या बैठकीचे कार्यवृत्त

**दिनांक** : २८ सप्टेंबर, २००६ (गुरुवार)

**वेळ** : सकाळी ११.३० वाजता

**सभास्थान** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
समिती कक्ष, ६ वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री.विलासराव देशमुख<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री.वसंत डावखरे<br>उपसभापती, विधानपरिषद | सदस्य |
| श्री.रविंद्र वायकर<br>अध्यक्ष, स्थायी समिती<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.अरुण गणेश देव<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.खान मोहम्मद हाजी अब्बास बसतीवाला<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.मंगेश श्रीधर सातमकर<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |

श्री.जॉनी जोसेफ — सदस्य
महापालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका

डॉ. टी. चंद्र शेखर — सदस्य-सचिव
महानगर आयुक्त

**<u>निमंत्रित :</u>**

श्री.पुंडलीक म्हात्रे
महापौर,
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका

श्रीमती मनिषा भोईर
महापौर,
नवी मुंबई महानगरपालिका

श्री.गुलाबराव करंजुले
नगराध्यक्ष,
अंबरनाथ नगरपरिषद

श्री.उमेश नाईक
नगराध्यक्ष,
नालासोपारा नगरपरिषद

श्री.मुकेश सावे
नगराध्यक्ष,
विरार नगरपरिषद

श्री.काशिनाथ पाटील
अध्यक्ष,
ठाणे जिल्हापरिषद

श्री.बाळाराम पाटील
अध्यक्ष,
रायगड जिल्हापरिषद

श्री.रमानाथ झा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष श्री. वसंत चव्हाण यांच्या दिनांक ११ जुलै, २००६ रोजी झालेल्या दु:खद निधनाबद्दल प्राधिकरणाने शोक व्यक्त केला व सदस्यांनी एक मिनिट स्तब्ध उभे राहून त्यांना श्रध्दांजली वाहिली. त्यानंतर, प्राधिकरणाने श्री.वसंत चव्हाण यांच्या निधनाबद्दलच्या शोक ठरावास (जोडपत्र) मंजूरी दिली.

त्यानंतर, विषयपत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक १८ मे, २००६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (११६ व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक १८ मे, २००६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (११६ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, शासनाने शासकीय उपक्रमांमध्ये अतिरिक्त ठेव गुंतविण्यासाठी आणखी एक शासन निर्णय दिनांक २२ मार्च, २००६ रोजी निर्गमित केला असून निधी गुंतविण्यासाठी वित्त संस्थांच्या यादीमध्ये आता सिकॉम या संस्थेचे नांव अंतर्भूत करण्यात आलेले आहे. शासनाच्या वित्त विभागाने निर्गमित केलेल्या गुंतवणूकीच्या दोन्ही शासन निर्णयास नगर विकास विभागाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार निधी गुंतविण्यासाठी वित्तीय संस्थेच्या यादीमध्ये सिकॉम या संस्थेचे नांव अंतर्भूत करण्यास मान्यता द्यावी अशी प्राधिकरणास विनंती करण्यात आली आहे.

त्यानंतर, प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी गुंतविण्यासाठी वित्तीय संस्थेच्या यादीत सिकॉम या संस्थचे नांव अंतर्भूत करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

..४/-

**<u>बाब क्र.३ :</u> <u>मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प - चारकोप - वांद्रे - मानखुर्द छन्नमार्गावर बांधा, स्वामित्व घ्या, वापरा व हस्तांतरीत करा (BOOT) /सार्वजनिक - खाजगी सहभाग (PPP) तत्वावर प्रकल्प उभारणे.</u>**

३.१ सुरुवातीस, दिल्ली मेट्रो रेल महामंडळाचे मुख्य अभियंता (नियोजन) श्री.एस.डी.शर्मा यांनी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाविषयी सादरीकरण केले. त्यानंतर या प्रस्तावासंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कुर्ला-वांद्रे-चारकोप या छन्नमार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्राधिकरणाने सप्टेंबर, २००५ मध्ये मान्यता दिली असून मार्च, २००६ मध्ये राज्य मंत्रिमंडळाने या प्रकल्पास मंजूरी दिली आहे. मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी स्टँडर्डगेजचा वापर करण्यास मंजूरी देताना राज्य शासनाने असा निर्णय घेतला की, कुलाबा-वांद्रे-चारकोप छन्नमार्गाचा भूयारी भाग महालक्ष्मीपासून वांद्रेपर्यंत वाढविण्यात यावा. त्यामुळे प्रकल्प खर्चात सुमारे रु.३००० कोटींची वाढ होणार असल्यामुळे BOOT/PPP या तत्वावर या प्रकल्पाची उभारणी करण्यास पूरेसा प्रतिसाद मिळेल असे वाटत नाही. यासंबंधात दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने अशी सूचना केली आहे की, वांद्रे-मानखुर्द छन्नमार्गाचा समावेश करुन चारकोप-वांद्रे दरम्यान पूर्णपणे उन्नत असा छन्नमार्ग उभारणे योग्य होईल. यासंदर्भात चारकोप-वांद्रे-मानखुर्द या पूर्णपणे उन्नत छन्नमार्गाचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून कुलाबा ते माहिम/वांद्रे या भुयारी छन्नमार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाने असे सुचविले आहे की, कुलाबा-चारकोप छन्नमार्गाची व्यवहार्यता तफावतीच्या तत्वावर अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच आर्थिक व्यवहार विभागाची तत्वत: मान्यता घेतल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरु करावी.

३.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, चारकोप-वांद्रे-मानखुर्द या छन्नमार्गावर बांधा, स्वामित्व घ्या, वापरा व हस्तांतरीत करा (BOOT) या तत्वावर सार्वजनिक-खाजगी सहभागाने मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्याचा प्रस्ताव आहे. सुमारे ३१.८७ कि.मी. लांबीच्या या छन्नमार्गामुळे पश्चिम व पूर्व उपनगरांना जोडणारी रेल्वेसेवा उपलब्ध होईल. या छन्नमार्गाची माहिती देताना महानगर आयुक्त यांनी प्रस्तावित मार्गरेषा, डेपो, स्थानके, प्रणाली परिमाणके,

भाडेरचना, आर्थिक व वित्तीय विश्लेषण, प्रवर्तन व देखभाल खर्च, कर व शुल्क इत्यादीसंबंधीची माहिती दिली. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, कर व शुल्क (सुमारे रु.९५२ कोटी) आणि जमिनीची किंमत (सुमारे रु.६६५ कोटी) धरुन मात्र बांधकाम कालावधीतील व्याज वगळून या प्रकल्पाच्या पूर्णत्वाचा अंदाजित खर्च रु.६१९२ कोटी इतका आहे. त्यापैकी व्यवहार्यता तफावतीची रक्कम सुमारे रु.१६५८ कोटी इतकी आहे. कर्ज : समभागाचे प्रमाण (DEBT : EQUITY RATIO) ७०:३० असे असेल. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी स्पेशल पर्पज व्हेईकल (SPV) स्थापन करावयाची असून एकूण समभागाची रक्कम सुमारे रु.११६० कोटी इतकी असेल. त्यापैकी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण/राज्य शासनाचा सहभाग २६% असेल. व्यवहार्यता तफावत तसेच समभागातील शासनाचा सहभाग धरुन शासनावर येणारा आर्थिक भार सुमारे रु.१९६० कोटी इतका असेल. प्राधिकरणातर्फे स्पेशल पर्पज व्हेईकलबरोबर ३५ वर्षाचा प्रकल्प अंमलबजावणीचा करार करण्यात येईल व त्यामध्ये प्रकल्प बांधकामासाठी लागणारा ५ वर्षाचा कालावधी समाविष्ट असेल. दिल्ली मेट्रो रेल प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाने कर व शुल्कामध्ये काही प्रमाणात सवलती दिल्या आहेत त्याप्रमाणे या प्रकल्पासाठीसुध्दा कर व शुल्कामध्ये सवलत मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. कर व शुल्कामध्ये सवलत मिळाल्यास तेवढी रक्कम कॅपिटल कॉन्ट्रिब्यूशनमधून (Viability Gap Funding) कमी करण्यात येईल. तसेच भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत आणि पायाभूत सुविधा हलविणे इत्यादी बाबींवरील खर्च राज्य शासनाने किंवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावा लागेल. या प्रकल्पासाठी एकूण सुमारे ४६.९८ हेक्टर इतकी जमीन आवश्यक असून त्यापैकी सुमारे ४४ हेक्टर जमीन राज्य शासनाच्या मालकीची आहे. ऑक्टोबर, २००६ अखेर या प्रकल्पास राज्य शासनाची मान्यता मिळेल असे अपेक्षित असून त्यानंतर डिसेंबर, २००६ अखेर या प्रकल्पासाठी जागतिक स्तरावर तांत्रिक व वित्तीय निविदा मागविण्यात येतील. त्यानंतर सप्टेंबर, २००७ अखेर प्रकल्पाच्या बांधकामास सुरुवात होईल. सन २०११ मध्ये प्रकल्प पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

**३.३** चर्चेदरम्यान, श्री.रामानंद तिवारी, प्रधान सचिव(१), नगर विकास विभाग यांनी अशी सूचना केली की, या प्रकल्पासाठी राज्य शासन / मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

यांच्यावरील आर्थिक भार कमी करण्यासाठी जमिनीचा वाणिज्यिक उपयोग करण्याच्या पर्यायाचा विचार करण्यात यावा. श्री.रमानाथ झा, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी असे निदर्शनास आणून दिले की, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे व्यवहार्यता तफावतीसाठी अनेक प्रस्ताव सादर केलेले असून त्या सर्वच प्रस्तावांना केंद्र शासनाची मान्यता मिळण्याची शक्यता नाही, म्हणून मुंबईतील प्रकल्पांचा प्राधान्यक्रम ठरवून त्याप्रमाणे व्यवहार्यता तफावतीची रक्कम मिळविण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे तसेच व्यवहार्यता तफावतीची पूर्ण रक्कम न मिळाल्यास निधी पुरवठयाची पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. श्री.अरुण देव, प्राधिकरणाचे सदस्य यांनी असे निदर्शनास आणून दिले की, मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी काही खाजगी मालमत्ता संपादन करावी लागणार असून त्यामध्ये फार पूर्वीपासून अस्तित्वात असलेली दुकाने/गाळे आहेत. ते कायदेशीर वहिवाटदार असल्यामुळे अशा प्रकल्पबाधितांचे योग्यप्रकारे पुनर्वसन होणे आवश्यक आहे. यासंबंधात मा.अध्यक्षांनी अशी सूचना केली की, शक्यतो त्याच जागी किंवा जवळपास कमर्शिअल कॉम्प्लेक्स तयार करुन अशा पात्र प्रकल्पबाधित लोकांचे पुनर्वसन करण्यात यावे.

३.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. १०८८</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोट-कलम (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे -

(१) मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या चारकोप-वांद्रे-मानखुर्द या छन्नमार्गावर बांधा, स्वामित्व घ्या, वापरा व हस्तांतरीत करा (BOOT) या तत्वावर सार्वजनिक-खाजगी सहभागाने मेट्रो रेल्वे सेवा उभारण्यासाठी अंदाजित एकूण रु.६१९२ कोटी इतक्या खर्चाच्या प्रकल्पास मान्यता देत आहे.

..७/-

(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून नामनिर्देशित करण्याची शिफारस राज्य शासनाकडे करीत आहे.

(३) चारकोप-वांद्रे-मानखुर्द सार्वजनिक जलद परिवहन प्रकल्प हा महत्वाचा सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रकल्प म्हणून जाहीर करण्याची शिफारस राज्य शासनाकडे करीत आहे.

(४) प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करावयाच्या स्पेशल पर्पज व्हेईकल (Special Purpose Vehicle) मधील राज्य शासनाच्या वतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे भागभांडवल जास्तीत जास्त २६% असे देण्यास मान्यता देत आहे.

(५) प्रकल्पाला लागणा-या व्यवहार्यता तफावतीची रक्कम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे देण्याकरीता राज्य शासनास शिफारस करण्यात येत आहे.

(६) प्राधिकरणातर्फे SPV बरोबर ३५ वर्षांसाठी प्रकल्प अंमलबजावणीचा करार करण्यास, ज्यामध्ये ५ वर्षाचा कालावधी हा प्रकल्पाच्या बांधकामासाठी असेल, मान्यता देत आहे.

(७) दिल्ली मेट्रो रेल प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाने कर व शुल्कामध्ये काही प्रमाणात सवलती दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे सदर प्रकल्पासाठीसुध्दा कर व शुल्कामध्ये काही सवलती मिळविण्याकरीता प्राधिकरणास प्रयत्न करावे लागणार आहेत. कर व शुल्कामध्ये सवलती मिळाल्यास तेवढी रक्कम भांडवल अभिदानाच्या (Capital Contribution) रकमेतून कमी करण्यात येईल. त्यासाठी केंद्र व राज्य शासनास प्राधिकरणातर्फे विनंती करण्यास मान्यता देत आहे. तसेच सदर व्यवहार्यता तफावतीची रक्कम प्राप्त होण्याकरीता केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यास तसेच केंद्र शासनाकडून व्यवहार्यता तफावतीपोटी संपूर्ण रक्कम न मिळाल्यास उर्वरित रक्कम राज्य शासनाने देण्याविषयी राज्य शासनास विनंती करण्यास मान्यता देत आहे.

(८) प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी जागतिक स्तरावर तांत्रिक व वित्तीय निविदा मागविण्यास मान्यता देत आहे.

(९) निधी उभारणीचे इतर वैकल्पिक मार्ग म्हणजे छन्नमार्गालगतच्या मालमत्तेचा विकास, जागतिक स्तरावरुन किंवा द्विराष्ट्र तत्वावर कर्ज घेणे इत्यादीसाठी मान्यता देत आहे.

(१०) मेट्रो सेवेसाठी प्रस्तावित भाडे दरास तत्वतः मान्यता देत आहे.

..८/-

(११) भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत, पायाभूत सुविधा हलविणे इत्यादी बाबींवर लागणारा खर्च राज्य शासनाकडून किंवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : विदेश संचार निगम लिमिटेड यांच्या प्रस्तावित वाणिज्यिक वापरासाठी (दूरसंचार इमारत) वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील भूखंड क्र.सी-२१ च्या वाटपाबाबत.**

**४.१** या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, ऑगस्ट, १९९८ मध्ये झालेल्या ९४ व्या बैठकीत प्राधिकरणाने विदेश संचार निगम लि. यांना वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील क्र.सी-३६ हा ८०९४ चौ.मी. क्षेत्रफळाचा वाणिज्यिक वापराचा भूखंड व त्यालगतचा क्र.आर-६ हा ४०४७ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड कर्मचारी निवासस्थाने यासाठी वाटप करण्यास मान्यता दिली होती. त्यावेळी वाणिज्यिक भूखंडाचा दर रु.५०,०००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र असा असतानाही विशेष बाब म्हणून या दोन्ही भूखंडांसाठी रु.२५,०००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र हा दर आकारण्यात आला होता. या दोन्ही भूखंड वाटपापोटी विदेश संचार निगम लि. यांनी अधिमूल्याची पूर्ण रक्कम प्राधिकरणाकडे भरली असून या दोन्ही भूखंडांचा सामायिक भाडेपट्टा विलेख तयार करण्यात आलेला आहे. तथापि, विदेश संचार निगम लि. यांनी दोन्ही भूखंडांवरील प्रस्तावित इमारतींसाठी प्राधिकरणाकडून विकास परवानगी घेतलेली नसून हे दोन्ही भूखंड अद्याप रिकामी आहेत. विदेश संचार निगम लि. यांनी डिसेंबर, २००५ मध्ये प्राधिकरणास अशी विनंती केली आहे की, त्यांना वाटप केलेला भूखंड क्र.आर-६ यावर कार्यालयीन वापर अनुज्ञेय करण्यात यावा. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकच्या सुधारित ले-आऊट मध्ये भूखंड क्र.आर-६ हाच आता भूखंड क्र.सी-२१ झालेला असून त्यावर वाणिज्यिक वापर अनुज्ञेय आहे. प्राधिकरणास जानेवारी, २००६ मध्ये प्राप्त झालेल्या

वाणिज्यिक वापरासाठीच्या भूखंडांच्या निविदेतील सर्वोच्च दर रु.१,५३,०५४/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र इतका आहे. भूखंड क्र.सी-२१ या ४०४७ चौ.मी. क्षेत्रफळाच्या व त्यावरील एकूण ८०९४ चौ.मी. अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रासाठी या सर्वोच्च दराने भरावयाच्या अधिमूल्याच्या रक्कमेतून भूखंड क्र.आर-६ साठी पूर्वी भरलेल्या अधिमूल्याची रक्कम वजा करुन उर्वरित देय असलेली अधिमूल्याची रक्कम रु.१०८,७०,५६,५७६/- भरण्यास विदेश संचार निगम लि. यांनी तयारी दर्शविली. त्यानुसार सदर भूखंड वाटपाच्या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांची मान्यता घेऊन विदेश संचार निगम लि. यांना भूखंड क्र.सी-२१ च्या वाटपाचा देकार देण्यात आला. प्राधिकरणाचा सदर देकार स्विकारुन विदेश संचार निगम लि. यांनी रु.१०८,७०,५६,५७६/- इतक्या अधिमूल्याची संपूर्ण रक्कम जून, २००६ मध्ये प्राधिकरणाकडे जमा केली आहे. आता या भूखंड वाटपास प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, विदेश संचार निगम लि. यांच्याशी पूर्वी भूखंड क्र.सी-३६ व भूखंड क्र.आर-६ साठी केलेल्या सामायिक भाडेपट्टा विलेखामधील भूखंड क्र.सी-३६ साठीच्या अटी व शर्ती कायम राहतील व आता नव्याने वाटप करावयाच्या भूखंड क्र.सी-२१ बाबत नव्याने भाडेपट्टा विलेख करण्यात येईल.

**४.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र. १०८९ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकंलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील भूखंड क्र.सी-२१ हा ४०४७ चौ.मी. एवढे क्षेत्रफळ असलेला व त्यावर ८०९४ चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्र उपलब्ध असलेला भूखंड, विदेश संचार निगम लि. यांना ८० वर्षाच्या

..१०/-

भाडेपट्टयाने व रुपये १,५३,०५४/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दरामध्ये त्यांनी भूखंड क्र.सी-२१ च्या जागेवर पूर्वी असलेल्या भूखंड क्र.आर-६ साठी भरलेल्या अधिमूल्याची वजावट त्यांना देण्यात येऊन त्यांचेकडून भूखंड क्र.सी-२१ साठी रुपये १०८,७०,५६,५७६/- (रुपये एकशे आठ कोटी सत्तर लाख छप्पन हजार पाचशे शहात्तर मात्र) इतक्या अधिमूल्याने व उक्त विनियमाच्या विनियम ७ प्रमाणे तसेच उक्त विनियमाच्या अन्य अटी व शर्तीनुसार, प्रस्तावित वाणिज्यिक वापर (दूरसंचार इमारत - Telecom Building) उभारण्यासाठी, वाटप करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** उक्त विनियमाच्या प्रपत्र - 'ड' (भाडेपट्टा विलेखाचा नमुना) मध्ये योग्य ते बदल करुन याबाबतीत विदेश संचार निगम लि. यांच्यासोबत भाडेपट्टा करार करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'ई' ब्लॉकमधील अर्बन प्लाझा व पार्कचे व्यवस्थापन आणि देखभाल करण्याबाबत सर्वोच्च निविदाकाराशी करार करण्याबाबत.**

**५.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'ई' ब्लॉकमधील सुमारे २.२ हेक्टर क्षेत्रात मनोरंजनासाठी अर्बन प्लाझा व पार्क प्राधिकरणाने विकसित केला आहे. सदर अर्बन प्लाझा व पार्कचे व्यवस्थापन व देखभाल करण्याच्या कराराची मुदत दिनांक २३ जून, २००६ रोजी संपणार असल्यामुळे पुढील २ वर्षांसाठी त्याचे व्यवस्थापन व देखभाल करण्यासाठी प्राधिकरणाने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविल्या तसेच त्याची माहिती प्राधिकरणाच्या वेब साईटवरही ठेवण्यात आली. त्यानुसार एकूण १० निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी जयकृष्णा इंडस्ट्रिज लि. यांचा देकार सर्वोच्च असून त्यांनी प्राधिकरणाला दरवर्षी रु.३०,६६,६६०/- या दराने २ वर्षांसाठी एकूण रु.६१,३३,३२०/- देऊ केले आहेत. जयकृष्णा इंडस्ट्रिज लि. यांनी निविदेमधील सर्व अटी व शर्तींची पूर्तता केली असल्यामुळे सदर निविदाकार पात्र असून त्यांचा सर्वोच्च देकार स्विकारण्यात यावा अशी मूल्यांकन समितीने शिफारस केली आहे.

त्यानुसार अर्बन प्लाझा व पार्कचे व्यवस्थापन व देखभाल करणे यासाठी जयकृष्णा इंडस्ट्रिज लि. यांची सर्वोच्च निविदा स्विकारुन त्यांच्याशी करार करण्याच्या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांची पूर्व मान्यता घेण्यात आली. त्यानंतर जयकृष्णा इंडस्ट्रिज लि. यांना देकार पत्र देण्यात आले. आता ही बाब प्राधिकरणाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र. १०९० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'ई' ब्लॉकमधील अर्बन प्लाझा व पार्कच्या दिनांक २४ जून, २००६ ते दिनांक २३ जून, २००८ या दोन वर्षाच्या कालावधीतील व्यवस्थापन व देखभालीसाठी जयकृष्णा इंडस्ट्रिज लि. हयांची रु.६१,३३,३२०/- (रुपये एकसष्ट लाख तेहतीस हजार तीनशे वीस मात्र) रक्कमेची निविदा स्विकारण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे तसेच निविदाकाराशी योग्य तो करार करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.६ : नरिमन पॉईंट येथील बहुमजली वाहनतळाच्या इमारतीमधील फुडकोर्ट हे भाडेपट्टयाने वाटप करण्याबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने बॅकबे रिक्लमेशन क्षेत्रातील भूखंड क्र.२४०-२४०ए हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास ९९ वर्षांकरीता बहुमजली वाहनतळासह वाणिज्य वापराची इमारत बांधण्यासाठी भाडेपट्टयाने दिलेला आहे. सन १९९७ मध्ये सदर भूखंडाच्या विकसनासाठी निविदा मागविल्या होत्या. प्राधिकरणाने मे.लार्सन ॲन्ड टुब्रो क्रॉस रोड यांची निविदा स्विकारुन त्यांच्याबरोबर जानेवारी, २००१ मध्ये पोटभाडेपट्टा करार केला. सदर पोटभाडेपट्टा करारानुसार बांधलेल्या

इमारतीमधील एकूण ६४०२.५४ चौ.मी. वाणिज्य क्षेत्रापैकी २००३.८८ चौ.मी. क्षेत्र मे.लार्सन ॲन्ड टुब्रो क्रॉस रोड प्राधिकरणाच्या ताब्यात विनामूल्य देण्यास तयार आहे. या क्षेत्रापैकी तळमजल्यावरील ११ दुकाने व पहिल्या मजल्यावरील फुडकोर्टचे एकूण क्षेत्र मिळून १७४७.९७३ चौ.मी. क्षेत्रफळाचे फुडकोर्ट क्षेत्र वापरण्यासाठी व चालविण्यासाठी १० वर्षाच्या भाडेपट्टयावर देण्याकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. १७४७.९७३चौ.मी. क्षेत्रफळाच्या या फुडकोर्ट जागेमध्ये तळमजल्यावरील दुकाने (३६.४८१चौ.मी.), पहिल्या मजल्यावरील पूर्व दिशेस असलेले फुडकोर्टचे क्षेत्र (७६८.६३३चौ.मी.), पहिल्या मजल्यावरील पश्चिम दिशेस असलेले फुडकोर्टचे क्षेत्र (६२६.२५८चौ.मी.), सेंटर लॉबी (१८१.४६५चौ.मी.), पहिल्या मजल्यावरील स्वच्छतागृह (१३५.१३६चौ.मी.) यांचा समावेश आहे. एकूण १५ निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये ५ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी झंकार बँक्वेटस्, एशियाड टॉवर, नवी दिल्ली यांचा रु.२८,८०,६५०/- इतक्या मासिक भाडयाचा देकार सर्वोच्च आहे. झंकार बँक्वेटस्, एशियाड टॉवर यांनी निविदेमधील सर्व अटी व शर्तींची पूर्तता केली असल्यामुळे सदर निविदाकार पात्र असून त्यांचा सर्वोच्च देकार स्विकारण्यात यावा अशी मूल्यांकन समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार झंकार बँक्वेटस्, एशियाड टॉवर यांची सर्वोच्च निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

**६.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. १०९१</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे नरिमन पॉईंट येथील बहुमजली वाहनतळाच्या इमारतीमधील १७४७.९७३ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळाच्या

फूडकोर्टच्या जागेसाठी प्राप्त झालेली रु.२८,८०,६५०/- इतक्या मासिक भाडयाची सर्वोच्च निविदा स्विकारुन सदर फूडकोर्टची जागा १० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने "झंकार बँक्वेटस्, एशियाड टॉवर" या सर्वोच्च निविदाकारास निविदेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींसह वाटप करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : तेल व नैसर्गिक वायू महामंडळ (ONGC) यांच्या प्रस्तावित कार्यालयासाठी वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील भूखंड क्र.सी-८ च्या वाटपाबाबत.**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, तेल व नैसर्गिक वायू महामंडळ (ओएनजीसी) यांनी त्यांच्या मुंबई येथील कार्यालयासाठी वांद्रे-कुर्ला संकुलात सुमारे २५००० चौ.मी. एवढे बांधकाम क्षेत्र उपलब्ध असलेला भूखंड उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती प्राधिकरणास केली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ नुसार शासन, स्थानिक प्राधिकरण किंवा सार्वजनिक उपक्रम यांना देकार देऊन किंवा त्यांचा देकार स्विकारुन त्यांना भूखंड वाटप करता येतो. ओएनजीसी हा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम असल्यामुळे त्यांची भूखंड वाटपाची विनंती मान्य करता येते. जानेवारी, २००६ मध्ये प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलातील वाणिज्य वापराच्या भूखंड वाटपासाठी निविदा मागविल्या असता रु.१,५३,०५४/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र इतका अधिमूल्याचा सर्वोच्च दर प्राप्त झालेला आहे. त्यानुसार वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील क्र.सी-८ हा ५९५१.९९ चौ.मी. एवढे क्षेत्रफळ असलेला व त्यावर १३६०० चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय असलेला भूखंड, ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने व रु.१,५३,०५४/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने एकूण रु.२०८,१५,३४,४००/- या अधिमूल्याने वाटप करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाने ओएनजीसी यांना

मार्च, २००६ मध्ये दिला होता. या प्रस्तावानुसार अधिमूल्याची ५०% रक्कम भूखंड वाटपाच्या देकार पत्राच्या दिनांकापासून एक महिन्यात व उर्वरित ५०% रक्कम त्यानंतर दोन महिन्याच्या आत भरावयाची आहे. ओएनजीसी यांनी सदर प्रस्ताव स्विकारल्यानंतर, सदर भूखंड वाटपाच्या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांची मान्यता घेण्यात आली व त्यानुसार अधिमूल्याची रक्कम भरण्याबाबत प्राधिकरणाने ओएनजीसी यांना दिनांक २७ जुलै, २००६ च्या पत्राद्वारे कळविले. प्राधिकरणाचा सदर देकार स्विकारुन ओएनजीसी यांनी रु.१०४,०७,६५,२००/- इतकी एकूण अधिमूल्याच्या ५०% रक्कम विहित कालावधीत प्राधिकरणाकडे जमा केली आहे. आता या भूखंड वाटपास प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे.

**७.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्र. १०९२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील भूखंड क्र.सी-८ हा ५९५१.९९ चौ.मी. एवढे क्षेत्रफळ असलेला व त्यावर १३६०० चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय असलेला भूखंड ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने व रु.१,५३,०५४/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने रु.२०८,१५,३४,४००/- (रुपये दोनशे आठ कोटी पंधरा लाख चौतीस हजार चारशे मात्र) इतक्या अधिमूल्याने व उक्त विनियमाच्या विनियम ७ प्रमाणे तसेच उक्त विनियमाच्या अन्य अटी व शर्तीनुसार, प्रस्तावित कार्यालयीन इमारत उभारण्यासाठी, तेल व नैसर्गिक वायू महामंडळ (ONGC) यांना वाटप करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

..१५/-

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** उक्त विनियमाच्या प्रपत्र 'ड' (भाडेपट्टा विलेखाचा नमुना) मध्ये योग्य ते बदल करुन याबाबतीत तेल व नैसर्गिक वायू महामंडळ यांचेकडून अधिमूल्याची उर्वरीत रक्कम विहित मुदतीत वसूल करण्यास व त्यांच्यासमवेत भाडेपट्टाविलेख करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल (दिनांक १ मे, २००६ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २००६).**

दिनांक १ मे, २००६ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २००६ या कालावधीत केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.९ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सन २००५-०६ चे वार्षिक लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या सन २००५-०६ च्या वार्षिक लेख्यांबाबत माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाने सन २००५-०६ च्या वार्षिक लेख्यांना मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०९३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वित्तीय) विनियम, १९७६ च्या नियम १३(फ) अन्वये प्राधिकरण याद्वारे प्राधिकरणाच्या सन २००५-०६ च्या लेख्यांना मान्यता देत आहेत.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाचे निव्वळ उत्पन्न रु.११७२ कोटी हे आयकर कायद्यातील कलम ११(२) अन्वये पुढील ५ वर्षात प्राधिकरणाच्या उद्दिष्टांसाठी उदा. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प व इतर विकास प्रकल्पाकरीता खर्च करण्यात यावेत. आयकर कायद्यातील कलम ११(५) अन्वये

रु.१२०० कोटी इतकी रक्कम गुंतविण्यात यावी व त्याप्रमाणे आयकर कायद्यातील तरतूदीनुसार आयकर खात्यास लेखी सूचना देण्याचे अधिकार (प्रपत्र क्र.१०) महानगर आयुक्त यांना याद्वारे प्रदान करण्यात येत आहेत.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन २००५-०६ चा वार्षिक अहवाल.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या सन २००५-०६ च्या वार्षिक अहवालाबाबत माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या सन २००५-०६ च्या वार्षिक अहवालास प्राधिकरणाने मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०९४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन २००५-०६ च्या वार्षिक अहवालास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे व सदर अहवाल राज्य शासनास सादर करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूलापर्यंत) वाढविणे तसेच मिठी नदी परिसराचा विकास करणे इत्यादींसाठी टप्पा-२ च्या कामाची अंमलबजावणी करणे.**

**११.१** महानगर आयुक्त यांनी सादरीकरण करुन या प्रस्तावाबाबत माहिती दिली. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मिठी नदीच्या एकूण सुमारे १८ कि.मी. लांबीपैकी वांद्रे-कुर्ला संकुलातील माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूलापर्यंतची सुमारे ६ कि.मी. लांबी मुंबई महानगर प्रदेश

..१७/-

विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात येते. जुलै, २००५ मधील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीचा अभ्यास करुन मिठी नदी व वाकोला नाला यांच्या प्रवाहात करावयाच्या सुधारणांबाबत अभ्यास करण्याची विनंती प्राधिकरणाने केंद्रीय जल व उर्जा संशोधन केंद्र, पुणे यांना केली. या संस्थेने सन १९७८ मध्ये केलेल्या शिफारशी आणि नवीन अभ्यासाप्रमाणे केलेल्या शिफारशींनुसार तसेच शासनाने नियुक्त केलेल्या सत्यशोधन समितीच्या अहवालातील या संदर्भातील शिफारशींनुसार वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदी व वाकोला नाला यांच्या सुधारणांची कामे प्राधिकरणाने २ टप्प्यांमध्ये हाती घेतली आहेत. त्यापैकी टप्पा-१ मध्ये मिठी नदीच्या माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूल या भागामधील पात्राचे तसेच वाकोला नाल्याच्या पात्राचे शक्य तेथे रुंदीकरण व खोलीकरण, माहिम कॉजवेजवळील खडक खोदाई, प्रकल्पबाधित लोकांचे पुनर्वसन इत्यादी कामे जून, २००६ अखेर पूर्ण करण्यात आली आहेत. केंद्रीय जल व उर्जा संशोधन केंद्र, पुणे यांच्या शिफारशींनुसार व आय.आय.टी., मुंबई यांच्या पर्यावरणविषयक सुधारणांच्या शिफारशींनुसार तसेच सत्यशोधन समितीच्या शिफारशींनुसार टप्पा-२ अंतर्गत मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली वाढविणे, माहिम कॉजवेजवळ व माहिम कॉजवे ते समुद्रात २.१४ कि.मी. पर्यंत खडक खोदाई, माहिम कॉजवे येथे स्लुईस पध्दतीच्या जलद्वारांची निर्मिती तसेच मिठी नदीवर असणा-या ७ पूलांचे रुंदीकरण, जलप्रवाहांच्या उताराची तीव्रता वाढविणे, किना-याच्या दोन्ही बाजूस आवश्यक तेथे संरक्षक भिंत बांधणे तसेच दुतर्फा रस्ते बांधून या प्रवाहांच्या परिसरात सुशोभिकरण करुन हरितपट्टे विकसित करणे इत्यादी कामांचा सुमारे रु.५७०.७६ कोटी इतक्या अंदाजित खर्चाचा प्रस्ताव तयार केला आहे. ही सर्व कामे मे.टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या देखरेखीखाली करण्यात येणार आहेत. सद्यस्थितीत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तिवरांचा भाग वगळता जलमार्गाचे खोलीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच टप्पा-२ अंतर्गतची कामे पूर्ण करण्यासाठी अतिक्रमणे हटविणे आवश्यक असून याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही हाती घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे माहिम कॉजवे येथील प्रस्तावित जलद्वारांचा पर्यावरणावर होणारा परिणाम इत्यादीबाबतचा अभ्यास करणे आवश्यक आहे. जलद्वाराचे स्थापत्यिय संकल्पचित्र तयार करणे आवश्यक असून त्या अनुषंगाने कार्यवाही स्वतंत्रपणे हाती घेण्यात येत आहे.

..१८/-

महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, टप्पा-२ मधील कामांची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने पुढील २ वर्षात (working season) करण्याचे नियोजन असून दुस-या वर्षाच्या निरिक्षणानंतर काही काम शिल्लक राहिल्यास ते काम तिस-या वर्षात पूर्ण करण्यात येईल. या रु.५७०.७६ कोटी अंदाजित खर्चाच्या कामांची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यासाठी तसेच सदर खर्च मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत करण्यास मान्यता देण्यासाठी प्राधिकरणास प्रस्ताव सादर केला आहे. टप्पा-२ च्या या कामांसाठी प्राधिकरणाच्या सन २००६-०७ च्या सुधारीत अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद करण्यात येईल.

**११.२** चर्चेदरम्यान, मा.अध्यक्षांनी अशी सूचना केली की, स्लुईस पध्दतीच्या जलद्वारांच्या निर्मितीचे जास्तीत जास्त काम जून, २००७ पर्यंत पूर्ण करण्यात यावे. तसेच माहिम कॉजवे भागात वारंवार होणारी अतिक्रमणे काढून टाकावीत.

**११.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र. १०९५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोट-कलम (ड) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूलापर्यंत तिवरांच्या भागात रुंदीकरण वगळता वाकोला नाल्यासह) वाढविणे, पूलांचे रुंदीकरण करणे, जलप्रवाहांच्या उताराची तीव्रता वाढविणे, किना-याच्या दोन्ही बाजूस आवश्यक तेथे संरक्षक भिंत व माहिम कॉजवे येथे जलद्वार उभारणे, दुतर्फा रस्ते बांधून, सुशोभिकरण करुन हरितपट्टे विकसित करणे, मिठी नदी व वाकोला नाल्याच्या प्रवाहांच्या परिसराचा तिवरांचा भाग वगळता विकास करणे इत्यादी टप्पा-२ मधील कामांची अंमलबजावणी करण्यास लागणा-या सुमारे

रु.५७०.७६ कोटी इतक्या अंदाजित खर्चास मान्यता देत आहे. तसेच या कामांसाठी प्राधिकरणाच्या सन २००६-०७ च्या सुधारीत अर्थसंकल्पात मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत तरतूद करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**पटल बाब : प्राधिकरणातील कर्मचा-यांना शासनाच्या धर्तीवर निवृत्तिवेतन व कुटुंब निवृत्तिवेतन योजना लागू करण्याबाबत.**

या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कर्मचा-यांसाठी सध्या अंशदायी भविष्य निर्वाह निधीची योजना अस्तित्वात आहे. या योजनेऐवजी प्राधिकरणातील कर्मचा-यांना राज्य शासकीय कर्मचा-यांच्या धर्तीवर सेवा निवृत्तिवेतन व कुटुंब निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात यावी अशी प्राधिकरणातील कर्मचारी संघटनांनी विनंती केली आहे. आता प्राधिकरणाचे नाव सार्वजनिक उपक्रमांच्या यादीतून वगळण्यात आलेले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (३) अन्वये महानगर प्राधिकरण हे स्थानिक प्राधिकरण असल्याचे मानण्यात येते. तसेच जानेवारी, २००३ मध्ये शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ मध्ये सुधारणा केल्यामुळे प्राधिकरण हे महानगरपालिका आहे असे मानण्यात येते. महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपरिषदा या स्थानिक प्राधिकरणातील कर्मचा-यांना सेवा निवृत्तिवेतन योजनेचा लाभ मिळतो त्याप्रमाणे प्राधिकरणातील कर्मचा-यांनाही तो मिळावा अशी प्राधिकरणातील कर्मचारी संघटनांनी मागणी केली आहे. प्राधिकरणातील कर्मचा-यांसाठी सेवा निवृत्तिवेतन योजना लागू करण्यासाठी निवृत्तिवेतन निधीची स्थापना करुन सदर निधीमध्ये सुमारे रु.८ कोटी इतकी रक्कम जमा केल्यास सदर निधी वर्धनक्षम होईल असा अहवाल प्राप्त झाला आहे.

..२०/-

चर्चेच्या दरम्यान मा.अध्यक्ष यांनी सेवानिवृत्ती योजना ही फक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणापूरती मर्यादित नसून ती लागू करणे झाल्यास इतरही महामंडळांचा विचार करावा लागेल. त्यामुळे चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव मंजूर केला :–

**<u>ठराव क्र.१०९६</u> :**

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कर्मचा-यांना शासनाच्या धर्तीवर सेवा निवृत्तीची योजना लागू करण्याबाबत ठराव क्र.१०९६ अन्वये असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने त्यांच्या कर्मचा-यांना ज्या धर्तीवर सेवानिवृत्तीची योजना लागू केलेली आहे त्याच धर्तीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कर्मचा-यांना सेवा निवृत्तीची योजना लागू करता येईल किंवा कसे याबाबतची तपासणी आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी करावी व तसा अहवाल राज्य शासनाकडे पाठवावा."

**<u>मा.अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा केलेले इतर विषय</u> :-**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील गट 'क' व गट 'ड' मधील कर्मचा-यांना २००५-०६ या वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदान देण्यात यावे अशी मागणी प्राधिकरणातील कर्मचारी संघटनांनी केली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (३) अन्वये महानगर प्राधिकरण हे स्थानिक प्राधिकरण असल्याचे मानण्यात येते. तसेच जानेवारी, २००३ मध्ये शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ मध्ये सुधारणा केल्यामुळे प्राधिकरण हे

..२१/-

महानगरपालिका आहे असे मानण्यात येते. १९९८-९९ या वित्तीय वर्षासाठी राज्य शासकीय कर्मचारी आणि इतर यांना तदर्थ बोनस देण्याबाबत राज्य शासनाच्या वित्त विभागाने दिनांक ५ नोव्हेंबर, १९९९ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानंतर राज्य शासनाने तदर्थ बोनस मंजूर केलेला नाही. या दिनांक ५ नोव्हेंबर, १९९९ च्या शासन निर्णयाप्रमाणे प्राधिकरणातील गट 'क' व गट 'ड' मधील कर्मचा-यांना २००५-०६ या वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदान द्यावयाचे झाल्यास सुमारे रु.१२ लाख इतका खर्च अपेक्षित आहे.

चर्चेनंतर, प्राधिकरणातील गट 'क' व गट 'ड' मधील कर्मचा-यांना २००५-०६ या वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदान देण्याची मागणी मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०९७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील गट 'क' व गट 'ड' मधील कर्मचा-यांना २००५-०६ या वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदान देण्यास मान्यता देत आहे. तसेच सानुग्रह अनुदानाची रक्कम निश्चित करुन अदा करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

************

जोडपत्र ...

<u>जोडपत्र</u>

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ११७ वी बैठक

**दिनांक : २८ सप्टेंबर, २००६**

**: ठ रा व :**

"श्री.वसंत चव्हाण, माजी नगर विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक ११ जुलै, २००६ रोजी निधन झाले. श्री.चव्हाण हे दिनांक १७ जुलै, १९९२ ते दिनांक ६ नोव्हेंबर, १९९२ या कालावधीत नगर विकास मंत्री म्हणून या प्राधिकरणाचे अध्यक्ष होते. या काळात श्री.चव्हाण यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री.चव्हाण यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**********